① ८

७-५८९

आ.क्र. माध्य.३(१७)/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता...
शाळा श्रीराम राज्य. [illegible]

संदर्भ : आपले पत्र क्रमांक : शिक्षण/माध्य/८-४/प्र.मा/२०००-२००१ दि. २१.४.२००१

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये श्रीराम राज्य शिक्षण संस्था, [illegible] संस्थेच्या श्रीराम राज्य माध्यमिक विद्यालय [illegible] माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/९ वी/१० वी च्या वर्गास २०००–२००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी [illegible] उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. [illegible]
१५. [illegible]

सत्यप्रत

प्र. मुख्याध्यापक
श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय
बिबवेवाडी, पुणे-३७

स्वाक्षरित शि. उ. सं. यांनी
सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

मुख्याध्यापक
श्री रामराज्य माध्यमिक विद्यालय
अप्पर शेवटचा बस स्टॉप,
खामकर गार्डन मागे, बिबवेवाडी, पुणे-३७.

मुख्याध्यापक
श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय
बिबवेवाडी, पुणे-३७

मुख्याध्यापक
श्री रामराज्य माध्यमिक विद्यालय
अप्पर शेवटचा बस स्टॉप,
खामकर गार्डन मागे, बिबवेवाडी, पुणे-३७.

Scanned with CamScanner

तात्काळ

१३
जा. क्र. माध्य. ३ (१४)/नमाशा/मान्यता/
पुवि / ४९७ २००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 12 FEB 2001

प्रति,

सचिव, श्री. रामराज्य शिक्षण संस्था,
बिबवेवाडी, पुणे-३७

विषय :- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत..................

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक : एसएसएन / / माशि-१४, दि. नमाशा/२०००/८४३०/२०००/माशि-१ दि. ३१.८.२०००

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून २००० पासून विनाअनुदान तत्वावर/~~कायम विना अनुदान~~ तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) ~~शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एसएसएन-१०/८८/१६६९/ एन, माशि-१, दिनांक १०-२-८४ अन्वये~~ विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा सहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी क येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्ययार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७) माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९) शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

Scanned with CamScanner

१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१३) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२(१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

इतर अटी :-

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरूद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. रामराज्य शिक्षण संस्था, बिबवेवाडी, पुणे-३७ | बिबवेवाडी, पुणे-३७ | ८ वी | मराठी |

(कायम विना अनु. तत्वावर जून 2000 पासून

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३,१ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची
सही नंतर

शिक्षण उपसंचालक
पुणे, विभाग, पुणे-१

...लपी :- पुणे.

१) िक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पुणे करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा, तसेच संस्थांविरूद्ध तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्य. शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

३) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना सविनय सादर.

Scanned with CamScanner

" यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [ माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४ ने. वाढ/२००१-०२
पुणे, दि. ४/६/२००१

प्रति,

मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,

~~श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी~~

~~पुणे ३७~~

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणे बाबत. सन ~~१९९७-९८~~ २००१-०२

इ. ~~६ वी~~, ~~इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~.

आपल्या ~~श्रीरामराज्य शिक्षण संस्था~~ द्वारा संचालित ~~श्रीरामराज्य माध्य. विद्यालय, बिबवेवाडी~~ माध्यमिक शाळेतील इ. ८ वी / ~~इ. ५ वी~~ चे वर्गास [ माध्यम मराठी / ~~इंग्रजी~~ ] सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्यम / ३ [१३]/ नशाशा / मान्यता / पुवि /१८२०/२००० दि. १२/२/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देण्यात येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी जि. प. पुणे / ~~गट-शिक्षणाधिकारी, पं. सं.~~ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेऊन तपासणी अहवाल या कार्यालयाकडे त्वरित सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शालांमध्ये इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शालांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे - १० यांचे कार्यालयाशी सकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे सादर करणे बाबत संपर्क साधावा.

J. N. H[illegible]
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे करिता.

Scanned with CamScanner

जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा. /०२ /०३.
पुणे, दि. ५/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी.
पुणे ३७.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३.
~~इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी~~, इ. १० वी.

आपल्या श्रीरामराज्य शिक्षण संस्था या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित श्रीरामराज्य माध्य. विद्यालय, बिबवेवाडी माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी ~~/इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/ ९८२०/२००० , दि. १२/२/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी~~, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे / ~~सह शिक्षणाधिकारी, पं. स.~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

सत्यप्रत
(स्वाक्षरी)
मुख्याध्यापक
श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय
बिबवेवाडी, पुणे-३७

J. N. H... (स्वाक्षरी)
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

मुख्याध्यापक
श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय
बिबवेवाडी, पुणे

Scanned with CamScanner

## सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

२. विहित नमुन्यातील शिफारस पत्र (इंग्रजी व मराठी.)

३. या कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

~~६. [illegible]~~

७. संस्थेची घटना. (झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली.)

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व शाळांचे नियम काटेकोरपणे पालन करण्याबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैर व्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्रे दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

---

(सही)
मुख्याध्यापक
श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय
बिबवेवाडी, पुणे-३७

Scanned with CamScanner

आदेश

यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे जिल्हा परिषद, पुणे
शिक्षण विभाग माध्यमिक,
जा.क.शिक्षण/माध्य/अति.तुकडी/अति.शिक्षक/२५०-८८
दिनांक :२३/९ /२००९

**विषय : समायोजनाने तुकडी मान्यता व अतिरिक्त शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी समायोजन.**
**संदर्भ : 1. शासन निर्णय क्र.माशातु-2006/(161/06)/माशि 1 दिनांक 12.06.2007**
**2. मा.शिक्षण संचालक, म.रा.पुणे 1 यांचे दि 8.12.1994 चे परिपत्रक**
**3. मा.शिक्षण संचालक, म.रा.पुणे 1 यांचे अमाशा-3095/15क दि 24.7.1995**

सन 2008-2009 या शैक्षणिक वर्षात करण्यात आलेल्या पटपडताळणीमध्ये आवासाहेब अत्रे दिन प्रशाला पुणे या विद्यालयातील इ.9 वी ची 3 री तुकडी कमी झाली आहे.
सदर कमी झालेली तुकडी गुणवत्तेनुसार,रामराज्य माध्य विद्यालय पुणे या विद्यालयास संदर्भ 1 वरील तरतुदीनुसार पुढील अटींच्या अधीन राहून इ.8 वी ची 2 री तुकडी समायोजनाने मंजूर करण्यात येत आहे.

1. सदरहू तुकडी 100% अनुदानावर मंजूर करण्यात येत आहे.
2. सदर तुकडीचे समायोजन अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यासह करण्यात येत आहे. अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतराचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.
3. सदर अतिरिक्त कर्मचा-याचे समायोजन न केल्यास आपल्या विद्यालयास मंजूर झालेली तुकडी संदर्भ 2 मधील तरतुदीनुसार आपोआप रद्द होईल.
4. समायोजन करण्यात आलेले अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी ज्या शाळेत समायोजन करण्यात आले आहे त्या ठिकाणी त्वरीत हजर न झाल्यास त्यांची सेवा म.खा.शा.क.(सेवाशर्ती) नियमावली 1981 मधील तरतुदीनुसार आपोआप संपुष्टात येईल.
5. सदर समायोजन संबंधित कर्मचा-याच्या वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण देऊन करण्यात येत आहे.
6. समायोजन करण्यात आलेल्या कर्मचा-याची सेवाज्येष्ठता म.खा.शा.क.नियमावली 1981 मधील तरतुदीनुसार नियमित होईल.
7. ज्या शिक्षकांची मूळ नियुक्ती प्रशिक्षित पदवीधर पदावर असूनही त्यांचे समायोजन तातपुरत्या स्वरूपात अपदवीधर पदावर करण्यात आले आहे त्यांची वेतनश्रेणी व वेतन यांना कोणतीही बाधा येणार नाही. भविष्यात रिक्त होणा-या पदवीधर पदावर त्यांचे समायोजन यथानियम करण्यात यावे.

| क्र. | अतिरिक्त कर्मचा-याचे नाव व सध्याची शाळा | हुद्दा | शै.पात्रता | वेतनश्रेणी | समायोजन केलेली शाळा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुकडी वाढीमुळे निर्माण झालेले पद या कार्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय भरू नये. | | | | |

उपरोक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यास त्वरित हजर करून घ्यावे व तसा अहवाल दि ६।२०९ रोजी **आर.सी.एम.गुजराथी हायस्कूल दारूवाला पूल पुणे** येथे स.11 ते 3 या वेळेत सादर करावा. त्यावेळी सुधारीत सेवकसंच मंजूरी प्रस्ताव आणून तो मंजूर करून घ्यावा.

**शिक्षणाधिकारी (माध्य)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

प्रत कार्यवाहीसाठी
1. अधिक्षक वेतन व भ.नि.नि.पथक,पुणे
2. मुख्याध्यापक
संबंधित शिक्षकास समायोजन केलेल्या शाळेवर रूजू होणेकरीता तात्काळ मुक्त करावे.
3. मुख्याध्यापक
संबंधित शिक्षकास हजर करून घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
4. श्री./श्रीम.....................................
यांस संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांचे मार्फत रवाना
2. त्यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वरील क्र 4 वरील सूचनेचे पालन करावयाचे आहे.

Scanned with CamScanner

वाचा -१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील निर्णय क्रमांक माशातु-२०१२/(९०/१२) / माशि-१ दिनांक १६ ऑगस्ट २०१२.

२) शासन निर्णय क्र.माशातु-२०१०/(४२०/१०) /माशि-१ दिनांक १४/६/२०१०.

३) मा.शिक्षण संचालक माध्य.व उच्च माध्य.शिक्षण संचालनाय पुणे यांचेकडील पत्र क्र.अमाशा/२०१२-१३/अतिरिक्त तुकडया/१५ क(०६)/ ८०८५ दिनांक २१/८/२०१२.

४) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.शिउसं/माध्य-३/१३/२२०७५/७१/ अतिरिक्त तुकडया/पुवि/१२ दिनांक ५/९/२०१२.

५) आपलेकडील सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ चे पटपडताळणी अहवाल तसेच सदर वर्षाचे अतिरिक्त तुकडी मागणी प्रस्ताव.

६) कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक १०/०९/२०१२.

---

पुणे जिल्हा परिषद पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/माध्य/अतितु/शिबीर/१२
पुणे दिनांक २८/०९/२०१२.

## विना अनुदान तुकडी मंजुरी आदेश –

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडयांना **सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर** मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर यादीनुसार आपल्या शाळेस खालील अटीस अधीन राहुन शहरी व ग्रामीण विभागातील शाळांतील **अतिरिक्त तुकडयांस शैक्षणीक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.**

| अ.नं | शाळेचे नाव | इयत्तानिहाय तुकडयांची संख्या | | | | | | एकूण तुकडया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | |
| | | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | |
| १ | श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी पुणे ३७ | ----- | ------- | ------- | ------- | १ | १ | २ |
| | | -------- | ------- | ------- | ------- | २ री | २ री | |

१) इ.५ वी ते ८ वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

२) इ.९ वी व १० वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना शाळेमध्ये माध्यमिक शाळा संहिता कलम ८.३ (एक) नुसार भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३) प्रत्यक्षात निकषानुसार आवश्यक विदयार्थी पटसंख्या कमी आढळल्यास सदरचे तुकडी मंजूरीचे आदेश आपोआप रद्द होतील.

Scanned with CamScanner

४) सदरच्या मंजूर केलेल्या तुकडयांना भविष्यात लागू होणा-या अनुदान सूत्रानुसार किंवा सदयस्थितीत लागू असलेल्या दिनांक १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या वर्षी मूल्यांकनात पात्र ठरतील त्या वर्षापासून म्हणजेच पाचव्या वर्षी २० टक्के, त्यापुढील वर्षी अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के या प्रमाणात सदर तुकडया अनुदानास पात्र होतील. अनुदानास तुकडी पात्र झाली म्हणजे त्या तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित तुकडयांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र तुकडयांना अनुदान लागू करेल.

28/9/2012

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रति,
मुख्याध्यापक संबंधित शाळा - श्रीरामराज्य माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी पुणे ३७
२/- सदर आदेशानुसार आपण सन २०१२-१३ ची सेवकसंच निश्चिती करुन घ्यावी.

**प्रत माहितीसाठी सादर** –

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-०१.

२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१

३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-०१.

Scanned with CamScanner

**कायम विना अनुदान**

जा.क्र. माध्य.३(१५)/५ ते ७/पुर्वि/२००९-१० ९३०६७/८०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 18 JUN 2010

प्रति,

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद , पुणे.

विषय : इयत्ता ५ वी चा वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करण्यास परवानगी देणे बाबत.
शाळा श्री रामराज्य माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी, पुणे.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.एसएसएन-१०९७/(५२८/९९)/माशि-१, दि.१ मार्च, ९९.
२. शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००२(२५६/२००२)/माशि-१,
दिनांक :- २७.६.२००३
३. आपले पत्र क्रमांक : दि. १०/३/२०१०
४. संस्थेचे प्रतिज्ञापत्र दि. ५ मार्च २००९

उपरोक्त विषयाधिन संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,या कार्यालयाने इ.८ वी चा वर्ग सुरु करणेस सन २० ००-.२० ०१ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता दिलेली आहे. सदर शाळेस सध्या इ.८ वी ते १० वी चे वर्ग सुरु असून संदर्भ क्रमांक २ अन्वये संस्थेंच्या संदर्भिय पत्र क्रमांक ४ च्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून सदर शाळेस सन २००९-२० १०शैक्षणिक वर्षा पासून इ.५ वी चा वर्ग सुरु करण्यांस खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

१. इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गाची परवानगी ही **कायम विना अनुदान** तत्वावर राहील.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. इ.५ वी ते ७ वी च्या वर्गाना सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यांत.
५. सदर कायम विनाअनुदान वर्गासाठीच्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाची जबाबदारी संस्थेची असेल.
६. भविष्यांत सदर वर्गाना अनुदानाची मागणी करता येणार नाही.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरु केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीच्या वेळी करावी व त्या बाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत. तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी -

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई.
२. मुख्याध्यापक, श्री रामराज्य माध्यमिक विद्यालय, बिबवेवाडी, पुणे-४११०३७.
३. निवडनस्ती

FORMATS

Scanned with CamScanner

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.जिप/माध्य-८/ 135/०९
दिनांक ३०/६/२००९

प्रति,

मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे - १

**विषय** - **माध्यमिक शाळेत इ.५ वी चा वर्ग सुरु करणेबाबत**
**श्रीरामराज्य माध्यमिक विदयालय, बिबवेवाडी पुणे**

**संदर्भ** - मुख्याध्यापक श्रीरामराज्य माध्यमिक विदयालय, बिबवेवाडी
यांचा दि.२६/३/२००९ चा प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये स ादर करण्यात येते की, श्रीरामराज्य माध्यमिक विदयालय, बिबवेवाडी पुणे या माध्यमिक विदयालयात इ.५ वी चा वर्ग सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करीत आहे.

सोबत शाळेचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर कायम विना अनुदान तत्वावर सदरचे वर्ग चालविणेस तयार असलेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले ओ. तसेच इ.५ वी ची विदयार्थी संख्या, संस्थेचा ठराव, शिक्षण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र, शिक्षक पालक संघ ठराव, स्वच्छतागृह उप्लब्धतेबाबत हमीपत्र, शासन नियमानुसार फी आकारण्याबाबत हमीपत्र तसेच आवश्यक ते कागदपत्र सादर केली आहेत. शाळेत सन २००९-१० या शैक्षणीक वर्षापासुन इ.५ वी चा वर्ग चालु करण्यास परवानगी मिळणेस या कार्यालयाची शिफारस आहे.

आपला विश्वासू,

**शिक्षणाधिकारी (माध्य.)**
पुणे जिल्हा परिषद पुणे.

**सोबत** - वरीलप्रमाणे प्रस्ताव फाईल

Scanned with CamScanner

**कायम विना अनुदान**

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/ १३२९/११
पुणे दिनांक १५/४/२०११

प्रति,

सचिव / अध्यक्ष
श्रीरामराज्य शिक्षण संस्था बिबवेवाडी
पुणे-३७

**विषय** - **नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत**
इ.६ वी (जून२०१० पासुन)

**संदर्भ** - १) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. क्र.माध्य-३/(१५)/ ५ ते ७/पुवि/२००९-१०/१३०६७/६९ दिनांक १८/६/२०१

२) मुख्याध्यापक श्रीरामराज्य माध्यममिक विदयालय बिबवेवाडी यांचा प्रस्ताव दिनांक २६/७/२०१०

आपल्याशैक्षणीक संस्थेव्दारा संचलीत **श्रीरामराज्य माध्यमिक विदयालय, बिबवेवाडी,पुणे-३७** या माध्यमिक शाळेस जुन २००९ पासुन **कायम विना अनुदान** तत्वावर इ.५ वीचा वर्ग सुरु करणेस संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी दिलेली आहे.

सदर विदयालयात जुन २०१० पासुन इ.६ वीचा वर्ग सुरु होत असुन सदरच्या वर्गास जुन २०१० पासुन नैसर्गिक वाढीने **कायम विनाअनुदान** तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परीषद, पुणे.

प्रत - १) मुख्याध्यापक,
श्रीरामराज्य माध्यमिक विदयालय, बिबवेवाडी, पुणे-३७.

२) मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.-

Scanned with CamScanner

कायम विना अनुदान

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य / १३० /१२
पुणे दिनांक ९/९/२०११

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**
श्रीरामराज्य शिक्षण संस्था,
बिबवेवाडी पुणे-३७

**विषय** - **नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत**
सन २०११-१२ इ.७ वी

**संदर्भ** - १. मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. क्र.माध्य-३/(१५)/ ५ ते ७/पुवि/२००९-१०/१३०६७/६९ दिनांक १८/६/२०१०
४. या कार्यालयाकडील पत्र दि.१५/४/२०११
५. आपलेकडील प्रस्ताव दि.१६/८/२०११

आपल्या संस्थेव्दारा संचलीत **श्रीरामराज्य माध्यमिक विदयालय, बिबवेवाडी पुणे-३७** या माध्यमिक शाळेस जुन २००९ पासुन कायम विना अनुदान तत्वावर इ.५ वीचा वर्ग सुरु करणेस संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी दिलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयाने इ.६ वीच्या वर्गास नैसर्गीक वाढीने जुन २०१० पासुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे.

**सदर विदयालयात जुन २०११ पासुन इ. ७ वीचा वर्ग सुरु होत असुन सदरच्या वर्गास जुन २०११ पासुन नैसर्गिक वाढीने कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.**

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परीषद, पुणे.

प्रत - मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.-

Scanned with CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र.9298 /खाप्राशा/०८ - ०९
पुणे, दिनांक — 6.6 २००८

## ना हरकत प्रमाणपत्र

विषय : इ.५वी प्रथम वर्ग सुरू करणेस परवानगी देणेबाबत.
संदर्भ : १) तुमचेकडील दि. 93/3/08 चा प्रस्ताव
२) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि.३० .१ .०६
३) शालेय शिक्षण विभाग व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-२ दि.२२.२.२००३
४) मा.शिक्षण मंडळ ठराव क्र.६ दि.२७.५.०८

उपरोक्त संदर्भ क्र.२ व ३ च्या शासन निर्णयातील नियमांचे पालन करणेचे अटीवर तुमचे अनुदानित/विनाअनुदान/~~कायम विनाअनुदानीत~~ मराठी/ ~~उर्दू~~ / ~~इंग्रजी~~ माध्यमाच्या शाळेस जून २००८पासून इ.५वी च्या प्रथम वर्गास विनाअनुदान/~~कायम विना अनुदान~~ तत्वावर सुरू करणेस संदर्भ क्र.४ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सदरचा दाखला तुमचे मागणीवरून देण्यात येत आहे.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका.

प्रति,
संस्थापक/मुख्याध्यापक,
श्री रामराज्य माध्यमिक विद्यालय,
अप्पर शेवटचा बसस्टॉप,
आमकर गार्डन जवळ,
बिबवेवाडी, पुणे - ३६.

दि. 6.6.08

आपल्या शाळेत स्काऊट गाईडचा उपक्रम व पथक नोंदणी करून सुरु करण्याच्या अटीवर वरील परवानगी आदेश देण्यात येत आहे. त्यानुसार कार्यवाही करून या कार्यालयास अहवाल सादर करावा.

C:\Masters\Shri\KADARE.doc476

Scanned with CamScanner